# सोलापूर विद्यापीठ

सोलापूर पुणे महामार्ग, केगांव,
**सोलापूर** - ४१३ २५५ (महाराष्ट्र)
website: http://su.digitaluniversity.ac

# SOLAPUR UNIVERSITY

Solapur Pune National Highway, Kegaon,
**Solapur** - 413 255 (Maharashtra)
EPABX: 0217-2744763, 66,67 Ext-125
Email : bcudsu@gmail.com


जा.क्र. सोविसो/मविविमं/शिमा/२०११-१२/ 10029 दिनांक : 9 FEB 2012

प्रति,
**मा. अध्यक्ष/सचिव,**
सर्व संलग्नित महाविद्यालये
व मान्यता प्राप्त शिक्षण संस्था.

**विषय : प्राचार्य व अध्यापकांची रिक्त पदे विद्यापीठ विहीत निवड समितीमार्फत भरणेबाबत.**

संदर्भ : १) या कार्यालयाचे पत्र क्र. SOL/UTY/BCUD/DH/१०१७५, दिनांक २२-०१-२००९
२) या कार्यालयाचे पत्र क्र. SOL/UTY/BCUD/AS/१५९४, दिनांक ०३-०६-२०१०
३) विद्यापीठ जाहीर प्रकटन प्रसिध्दी - दिनांक ०५-०६-२०१०.
४) विद्यापीठ जाहीर प्रकटन प्रसिध्दी - दिनांक १०-१२-२०१०.
५) या कार्यालयाचे पत्र क्र.सोविसो/मविविमं/शिमा/२०१०-२०११/१०७०१, दि. ०८-०३-२०११
६) मा.शिक्षण संचालक, पुणे यांचे पत्र क्र. अशाम/संकीर्ण/२०११/प्राचार्य रिक्त पदे/मवि-२-३/१०४७, दि.१२-५-२०११
७) मा.विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर यांचे पत्र क्र. शिससं/उशि/सोवि/२०११/५४७, दि.०२-०६-२०११
८) या कार्यालयाचे पत्र क्र.सोविसो/मविविमं/शिमा/२०११-२०१२/४१४१, दि. १८-०८-२०११

महोदय,

उपरोक्त विषयी मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर यांनी याचिका क्र. २२१६/२००६ मध्ये दि.०३-१२-२००८ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने संदर्भ क्र. १ ते ५ अन्वये आपणास, आपल्या महाविद्यालयातील प्राचार्य, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक व ग्रंथपाल ही पदे त्वरित भरावीत, असे कळविण्यात आले होते. तसेच मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांनी याचिका क्र. एस.एल.पी. (सी) १३९४४/२००९ मध्ये दि.२८-०३-२०११ रोजी दिलेल्या निकालात प्राचार्य पद त्वरित विद्यापीठ निवड समितीमार्फत भरणेबाबत निर्देशित केलेले आहे. याबाबत या विद्यापीठाकडून संदर्भ क्र. ८ अन्वये कळवून ही आपल्या महाविद्यालयातील रिक्त प्राचार्य/अध्यापकांची पदे अद्याप भरलेली नाहीत.

उच्च शिक्षणाचा दर्जा राखणेसाठी, नॅक मुल्यांकन/पुर्नमुल्यांकनासाठी व विद्यापीठ अनुदान आयोगाकडे वेगवेगळया योजने अंतर्गत अनुदान मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणे, शैक्षणिक, प्रशासकीय, आर्थिक प्रशासन व्यवस्थित चालविणेसाठी नियमित प्राचार्य असणे आवश्यक आहे.

उक्त संदर्भीय पत्र व आपल्या महाविद्यालयाच्या पत्र व्यवहारावरुन विद्यापीठ प्रशासनास असे निदर्शनास आले आहे की, मा.उच्च न्यायालय, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय व विद्यापीठ प्रशासन यांचेकडून वेळोवेळी दिलेल्या निदेशाचे/आदेशाचे अनुपालन आपणाकडून झालेले नाही. आपणाकडून महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम ८१ मधील उपकलम (च), (छ) व (ज) मधील तरतूदीचे ही वेळोवेळी उल्लंघन झालेले आहे.

यास्तव आपणास आदेशित करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील प्राचार्य व अध्यापकांची रिक्त पदे त्वरित विद्यापीठ विहित निवड समितीमार्फत दिनांक ३१-०५-२०१२ पूर्वी भरणे अनिवार्य आहे. अन्यथा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम ९१ अन्वये व तद्अनुषंगिक परिनियमान्वये, असंलग्नीकरण करणेबाबतची विहित कारवाई करण्यात येईल, याची गंभीरपणे अंतिम नोंद घेवून, आपण आवश्यक ती कार्यवाही करावी.

सदरील पत्र विद्यापीठाच्या http://su.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर Circulars/GR/ Notices या मथळ्याखाली Regarding Filling of Post of Principal & Teachers या लिंकवर उपलब्ध आहे.

आपला विश्वासू,

**(प्राचार्य डॉ. राजेंद्र ना. शेंडगे)**
**संचालक,**
महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ

प्रत : माहिती व कार्यवाहीस्तव -

मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई -३२

मा. प्र.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण सोलापूर विभाग, सोलापूर विद्यापीठ परिसर, सोलापूर.